| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 6 Jan 2025 | Importance of insurance for economic planning? | Kesari |

# आर्थिक नियोजनासाठी विमा का महत्त्वाचा?

नवीन वर्षात अर्थिक नियोजन पूर्वीपेक्षा अधिक खडतर झाले आहे. आर्थिक नियोजनात समभाग, म्युच्युअल फंड आणि रिअल इस्टेटमध्ये गुंतवणूक प्रामुख्याने चर्चेत येते. पण, आर्थिक नियोजनात विम्याचाही सहभाग असतो. संकटकाळात आर्थिक स्थैर्य प्राप्त व्हावे, यासाठी विमा आवश्यक आहे. त्यामुळे या आर्थिक वर्षात आर्थिक उद्दीष्ट साध्य करण्यासाठी प्रथम विम्याचा विचार केला पाहिजे.

## अनिश्चित जीवनासाठी सुरक्षेचे जाळे

जीवनाबाबत भाकीत करता येत नाही आणि आर्थिक धक्के कोणतीही पूर्वसूचनेशिवाय बसतात. वैद्यकीय आणीबाणी, नैसर्गिक आपत्ती किंवा अचानक मृत्यूमुळे ठेवी आणि गुंतवणुकीवर परिणाम होतो.

**उदाहरणार्थ :** वैद्यकीय उपचार खर्च वाढतो. त्यामुळे आरोग्य विमा संरक्षक बनतो. जीवन विमा आर्थिक सुरक्षेबरोबरच तुमच्या अनुपस्थितीत जवळच्या व्यक्तींना फायदेशीर ठरतो. विमा कवच नसेल तर गुंतवणूक कमी होत जाते किंवा कर्जामुळे तुमचे आर्थिक भवितव्य पणाला लागते.

## कष्टाने संपादित मालमत्तेचे संरक्षण करा

तुमची मालमत्ता जशी घरे आणि वाहने देखील तुमच्या आर्थिक विषयाचा अंतर्गत भाग आहेत. योग्य विमा पॉलिसीद्वारे तुम्ही घरे आणि वाहनांचे संरक्षण करू शकता. सर्वंकष गृह विमा योजना नैसर्गिक आपत्ती जसे पूर, भूकंप किंवा आगीपासून झालेल्या नुकसानीची भरपाई देऊ शकतो. वाहन विमा देखील नुकसान, चोरी आणि दायित्व, मोठी दुरूस्ती किंवा वाहनांचे बदलेल्या भागांचा खर्च मिळवून देतो.

## आणीबाणीत दायित्वाची खात्री

आणीबाणीच्या प्रसंगी तातडीने निधी गरज भासते. अशा काळात विमा पॉलिसी आर्थिक पाठबळ मिळवून देते. मुदतपूर्व गुंतवणूक काढून घेण्याचे संकट टळते. पर्यायाने आर्थिक नुकसान किंवा दंडापासून मुक्तता होते. रुग्णालयाची बिले तुमच्या बचतीला धक्का न लावता आरोग्य विम्याचा माध्यमातून भरू शकता. मुदत विमा तुमच्यावर अवलंबून व्यक्तींना एक रकमी रक्कम मिळवून देतो आव्हानात्मक काळात तातडीने विमा पॉलिसी मोडता देखील येते.



**आदित्य शर्मा**
प्रमुख वितरण अधिकारी,
किरकोळ विक्री, बजाज अलियांझ

## प्राप्तिकरातील वजावटीचा लाभ

विम्यामुळे प्राप्तिकर भरताना तुम्हाला करात सवलत देखील मिळते. कर सवलत एक आर्थिक साध्य आहे. प्राप्तिकर कायद्याचे कलम ८० सी चा विचार केला जीवन विम्याचे हप्ते भरणाऱ्याला करातून वर्षाला दीड लाख रुपयांपर्यंतची वजावट मिळते. त्या शिवाय कलम ८० डी अंतर्गत आरोग्य विम्याचे हप्तेही वजावटीसाठी पात्र असतात. त्यामुळे विमा काढल्यामुळे विमा कवच प्राप्त होण्याबरोबरच तुम्ही आर्थिक भवितव्य भक्कम करता तसेच कर दायित्व देखील वाढवत असता. विमा कवच आणि कर वजावट, असे दुहेरी लाभ मिळतात. एकंदरीत आर्थिक व्यवस्थापनाचा विचार करता या दोन्ही बाबी तुमच्या फायद्याच्याच आहेत.

## आर्थिक शिस्तीचे पालन

आर्थिक शिस्तीचे पालन करताना विम्याचे हप्ते वेळेवर भरणे क्रमप्राप्त आहे. भविष्यातील सुरक्षेसाठी हप्ते भरणे सवय करुन घ्यायला हवी. अशा आर्थिक शिस्तीमुळे तुम्ही एक आर्थिक जबाबदारी सांभाळत असता. त्यामध्ये निधीतील अत्यावश्यक गुंतवणूक बाजूला काढून ठेवता. त्यामुळे एकाच वेळी मानसिक ताण टाळता आणि तुम्ही चिंतामुक्त होता.

## जीवनशैलीत बदल आणि संकटांचा सामना

आधुनिक जीवनशैलीमुळे आव्हाने उभी ठाकली आहेत. शहरीकरण, बैठी नोकरी आणि पर्यावरणीय घटकांमुळे आरोग्य धोक्यात आले असून जीवन जगण्यासाठी होणारा खर्च पाहता आरोग्य आणि जीवन विमा योजना संकटकाळी कामाला येतो. कुटुंबाला आर्थिक सुरक्षा प्राप्त होते. त्यामुळे आर्थिक नियोजन करताना विम्याचा समावेश त्यात आवश्यक आहे. त्याद्वारे अचानक उभी राहणारी आव्हाने आणि अचानक होणाऱ्या खर्चांचा विचार करता विमा योजना फायद्याच्या ठरतात.

## योग्य विमा निवडा

आर्थिक नियोजनात विमा कवच एक भाग आहे. त्यामुळे योग्य विमा पॉलिसी निवडणे आवश्यक आहे. कोणती विमा योजना निवडावी ते आता पाहूया.

- **तुमच्या गरजा ओळखा :** तुमच्या वयाचा टप्पा, आर्थिक जबाबदारी आणि धोका. उदाहरणार्थ : तरुण व्यावसायिक प्रामुख्याने मुदत आणि आरोग्य विमा घेतो. घर खरेदीदार सर्वकष गृह विमा रचना आणि सामग्रीसाठी घेतो. सध्या सायबर चोरीचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने सायबर विमा घेणे योग्य ठरेल.
- **विमा कवचातील पर्याय समजून घ्यावेत :** विम्याचा हप्त्याची रक्कम किती? त्यापेक्षा कवचात नेमके काय हवे ते पाहावे. उदाहरणार्थ आरोग्य विम्यात आणखी काही अधिक मिळते का?
- **पॉलिसीचे पुनरावलोकन करावे :** आर्थिक उद्दिष्ट आणि जबाबदारीचा विचार करता पॉलिसीच्या पोर्टफोलिओचे पुनरावलोकन करणे आवश्यक आहे.
- **विमा हा नुसता खर्च नाही**

आर्थिक स्थैर्यासाठी ती केलेली एक गुंतवणूक आहे, त्यामुळे मानसिक शांतता प्राप्त होते. या वर्षात आर्थिक उद्दिष्टे गाठणाऱ्या क्रमवारीत विमा एक भाग असायलाच हवा. तो तुम्हाला भविष्यातील संकटांना तोंड देण्यासाठी एक आत्मविश्वास निर्माण करणार आहे. आतापासून तुमच्या गरजा ओळखा, विमा सल्लागाराशी चर्चा करा आणि विमा योजनेला प्राथमिकता देऊन या वर्षातील आर्थिक पाया भक्कम करण्यासाठी पावले टाका. त्यामुळे तुम्ही तुमचे भवितव्य आणि स्वप्ने पूर्ण करु शकाल. पर्यायाने तुम्ही नवीन वर्ष अधिक लवचिक आणि समृद्ध बनवू शकणार आहात.